ताहीर हुसेनसह ५ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

आयबी अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी दिल्ली न्यायालयाचा निकाल

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

उत्तर-पूर्व दिल्लीत २०२० मध्ये झालेल्या दंगलीदरम्यान इंटेलिजन्स ब्युरोचे अधिकारी अंकित शर्मा यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी दिल्लीच्या कडकडडूमा न्यायालयाने शुक्रवारी माजी नगरसेवक ताहीर हुसेनसह पाचही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

दयाळपूर भागात घडलेल्या या घटनेत अंकित शर्मा यांची हत्या करून त्यांचा मृतदेह नाल्यात फेकून देण्यात आला होता. न्यायालयाने हा गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीला हादरा देणारा असल्याचे म्हटले आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधिशांनी ताहीर हुसेन, नाझिम, कासीम, जावेद आणि अनस या पाचही जणांना हत्येच्या गुन्ह्याखाली जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ताहीर हुसेनला ५ लाखांचा, तर उर्वरित इतर चार आरोपींना प्रत्येकी २५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

न्यायालयाचे निरीक्षण : न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, हत्येनंतर मृतदेहाला जनावरासारखे ओढत नेण्यात आले होते. परंतु, हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ' या श्रेणीत मोडत नाही. तसेच सरकारी पक्षाला आरोपींपैकी कोणाची काय विशिष्ट भूमिका होती, हे स्पष्टपणे सिद्ध करता आले नाही.

अपहरणाच्या गुन्ह्याखाली सर्व आरोपींना ७ वर्षांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्यासाठी ताहीर हुसेनला ५०,००० आणि इतर आरोपींना प्रत्येकी १०,००० रुपयांचा दंड करण्यात आला. याशिवाय दोन समुदायांमध्ये शत्रूत्व पसरवणे आणि दंगल घडवून आणणे या गुन्ह्यांसाठीही त्यांना दोषी ठरवून शिक्षा सुनावण्यात आली आहे.

शिक्षा सुनावल्यानंतर आरोपींच्या नातेवाईकांना न्यायालयातच रडू कोसळले. कोर्टातून बाहेर पडताना आरोपींच्या बाजूने उच्च न्यायालयात या निर्णयाविरोधात दाद मागणार असल्याचे सांगण्यात आले. सुनावणीदरम्यान कडकडडूमा न्यायालयात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

इस्रायल-हमास युद्धाला पूर्णविराम मिळण्याची शक्यता!

◆ वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षादरम्यान मागील काही महिन्यांपासून जगभरात खळबळ उडवून देणाऱ्या इस्रायल-हमास युद्ध संपवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठा पुढाकार घेतला आहे. इस्रायल-हमास संघर्ष थांबवून मध्य-पूर्वेत शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने ट्रम्प यांच्या 'शांतता मंडळाने' एका ऐतिहासिक युद्धविराम कराराची घोषणा केली असून, या कराराला इस्रायल आणि हमासने सहमती दर्शवल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी जाहीर केले की, या करारामुळे हमास आणि गाझामधील इतर सशस्त्र गट आपली शस्त्रे खाली ठेवतील. हा करार युद्ध संपवण्याच्या '२०-कलमी योजने'च्या अंमलबजावणीमधील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. गाझाचा कारभार एका नवीन पॅलेस्टिनी सरकारद्वारे चालवला जाण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असून, हे नवीन सरकार 'शांतता मंडळाच्या' सहकार्याने काम करेल. या करारामुळे इस्रायलला आवश्यक ती सुरक्षा मिळेल आणि यापुढे या प्रदेशाचा वापर कोणत्याही हल्ल्यांसाठीचा तळ म्हणून केला जाणार नाही.

हमासची सहमती कशी झाली?

'अल जझीरा'च्या वृत्तानुसार, कतार, तुर्की आणि इजिप्त या देशांनी यशस्वी मध्यस्थी केल्यानंतर हमासने या करारावर स्वाक्षरी करण्यास सहमती दर्शवली. वाटाघाटींमधील सर्वात कळीचा मुद्दा असलेल्या शस्त्रे खाली ठेवण्याच्या विषयावर, हमास आपली शस्त्रे 'आंतरराष्ट्रीय स्थिरीकरण दला'कडे सोपवण्यास तयार झाला आहे.

कराराची अंमलबजावणी

डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केल्यानुसार, या कराराची अंमलबजावणी ठराविक टप्प्यांत केली जाईल. हमासकडून शस्त्रत्याग पूर्ण होताच इस्रायली सैन्य गाझामधून पूर्णपणे माघार घेईल. 'शांतता मंडळ' हे नवीन पॅलेस्टिनी पोलीस दलासोबत मिळून गाझाचे रहिवासी आणि शेजारील भागांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारेल. व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनानुसार, हमासच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील इस्रायलबरोबरचा हा संघर्ष संपवण्यासाठी करार झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

'समुद्र मंथन' योजनेला केंद्राची मंजुरी; ८४,०८४ कोटींची तरतूद!

देशांतर्गत तेल आणि वायू उत्पादनाला गती मिळणार

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'समुद्र मंथन' मंजूर करण्यात आली. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या या केंद्रीय क्षेत्र योजनेसाठी ८४,०८४ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली असून, ही योजना २०३०-३१ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

केंद्र सरकारच्या माहितीनुसार, ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ च्या स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून मांडलेल्या आधुनिक 'समुद्र मंथन' संकल्पनेची अंमलबजावणी आहे. या माध्यमातून भारताच्या विस्तीर्ण सागरी क्षेत्रातील तेल आणि नैसर्गिक वायूच्या संभाव्य साठ्यांचा शोध घेण्यावर भर दिला जाणार आहे.

या योजनेमुळे देशाची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत होण्यास, देशांतर्गत तेल आणि वायू अन्वेषण व उत्पादनाला गती मिळण्यास, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला बळ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

देशातील बांधकाम प्रकल्पांना ४ महिन्यांची मुदतवाढ द्या!

पश्चिम आशियातील संकटामुळे केंद्र सरकारचा 'रेरा'ला सल्ला

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे विस्कळीत झालेल्या पुरवठा साखळीचा फटका बसलेल्या रिअल इस्टेट प्रकल्पांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने सर्व राज्य रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणांना (रेरा) पात्र रिअल इस्टेट प्रकल्पांच्या नोंदणीला आणि ते पूर्ण करण्याच्या मुदतीला ४ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा सल्ला दिला आहे.

शुक्रवारी जारी केलेल्या या मार्गदर्शक सूचनेत मंत्रालयाने स्पष्ट केले की, पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे जागतिक पुरवठा साखळीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. यामुळे बांधकाम साहित्याचा तुटवडा निर्माण झाला असून, रिअल इस्टेट प्रकल्पांच्या वेळेत पूर्ण होण्यावर याचा थेट परिणाम झाला आहे.

वित्त मंत्रालयाच्या खर्च विभागाने २९ एप्रिल २०२६ च्या कार्यालयीन निवेदनाद्वारे पश्चिम आशियातील परिस्थितीला "फोर्स मॅजेर" (अकल्पित किंवा अनियंत्रित परिस्थिती) कलमांतर्गत "युद्ध" म्हणून घोषित केले आहे.

'रिअल इस्टेट कायदा, २०१६' (रेरा) च्या कलम ६ नुसार, युद्धासारख्या अकल्पित परिस्थितीमुळे प्रकल्पाचा नियमित विकास बाधित झाल्यास प्रकल्पाच्या नोंदणीला मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. ज्या नोंदणीकृत रिअल इस्टेट प्रकल्पांची अंतिम मुदत, सुधारित मुदत किंवा वाढीव मुदत २८ फेब्रुवारी २०२६ किंवा त्यानंतर संपत आहे, अशा सर्व प्रकल्पांना ही ४ महिन्यांची मुदतवाढ दिली जावी. तांत्रिक आणि प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी, प्रत्येक प्रकल्पाकडून वेगळे अर्ज मागवण्याऐवजी सर्व पात्र प्रकल्पांसाठी राज्य 'रेरा'ने एकच सामायिक आदेश काढून ही मुदतवाढ मंजूर करावी, असा सल्ला मंत्रालयाने दिला आहे.

'नारेडको'कडून निर्णयाचे स्वागत

■ नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नारेडको) चे अध्यक्ष प्रवीन जैन यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ते म्हणाले, "गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने घेतलेला हा अत्यंत वेळेवर आणि व्यावहारिक निर्णय आहे. पश्चिम आशियातील भू-राजकीय परिस्थितीमुळे बांधकाम साहित्याची उपलब्धता आणि किमतींवर मोठा परिणाम झाला आहे, ज्यामुळे प्रकल्पांच्या कामात न टाळता येणारा विलंब झाला आहे."

■ जैन यांनी सर्व राज्यांच्या रेरा प्राधिकरणांना या सूचनेची त्वरित आणि एकसमान अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. यामुळे नियंत्रणाबाहेरील परिस्थितीचा सामना करणाऱ्या विकासकांना मोठा दिलासा मिळेल आणि अनावश्यक न्यायालयीन वाद टळून ग्राहकांचे हित जपले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वाडा नगरपंचायत

ता.वाडा जि.पालघर
मु.पो.ता. वाडा जि. पालघर पिन - ४२१३०३.
EmailID nagarpanchayatwada@gmail.com
whatsapp no. 9922770550 toll free complaint no. 18002331180

जा.क्र. वानप/१८६२/२०२६ दि. ३०/०७/२०२६

वाडा नगरपंचायत, वाडा जि.पालघर

जाहीर सूचना

(महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२१ (२) व १२४ अन्वये)

वाडा नगरपंचायत, वाडा संपूर्ण हद्दीतील संपूर्ण मालमत्ताकरिता (इमारती व खुले भूखंड) सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पंचवार्षिक मुल्यनिर्धारणाच्या एकूण वार्ड १ ते ८ पर्यंत अंतिम कर आकारणी याद्या मा. प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी वाडा नगरपंचायत तथा नगररचनाकार, सहायकसंचालक, नगररचना पालघर यांनी तपासणी करून अंतिमरित्या अधिप्रमाणित केलेल्या आहेत, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२१ (२) व १२४ नुसार अंतिम कर मूल्यनिर्धारण याद्या मालमत्ता धारकाच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ याद्वारे जाहीररीत्या प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर याद्या वाडा नगरपंचायत कर विभागामध्ये सर्व संबंधित मालमत्ता धारकास, भोगवटदारास व त्यांच्या अभिकर्त्यास अवलोकनार्थ उपलब्ध असतील. अधिप्रमाणित केलेल्या याद्या नुसार संबंधित मालमत्ता धारकास कलम १५० अन्वये मागणी देयके देण्यात येईल.

सही /-
दिनांक : ३०/०७/२०२६
(मनोज पष्टे)
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत, वाडा

आता सर्व ब्रँडच्या कपड्यांची साईज एकसारखीच!

नॅशनल सायझिंग फ्रेमवर्कमुळे भारतीयांच्या शरीराच्या ठेवणीनुसार तयार होणार कपडे

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

जर तुम्ही एखाद्या ब्रँडचा 'मिडियम' साईजचा शर्ट घालत असाल, परंतु दुसऱ्या ब्रँडमध्ये तीच 'मिडियम' साईज तुम्हाला नीट बसत नसेल, तर लवकरच ही अडचण दूर होऊ शकते. सर्व ब्रँड्समध्ये साईजमध्ये एकरूपता आणण्याकरिता केंद्र सरकार कपड्यांसाठी 'नॅशनल सायझिंग फ्रेमवर्क'ला अंतिम रूप देण्याच्या कामात व्यस्त आहे. यामुळे देशात कोणत्याही ब्रँडचा 'स्मॉल', 'मिडियम' किंवा 'लार्ज' साईजचा शर्ट किंवा इतर कपडे खरेदी करताना लोकांना वेगवेगळ्या फिटिंगचा त्रास सहन करावा लागणार नाही.

ही व्यवस्था युरोप-अमेरिकेप्रमाणेच मानकीकृत (स्टँडर्ड) साईज प्रणालीवर आधारित आहे, परंतु ती भारतीय शरीराच्या रचनेनुसार तयार केली जाईल. वस्त्रोद्योग मंत्रालयाने स्थापन केलेले टास्क फोर्स उद्योग, रिटेलर्स आणि तज्ज्ञांसोबत मिळून याचे अंतिम मानक ठरवत आहे.

भारतीय ग्राहक स्मॉल, मिडियम आणि लार्जसारख्या साईज अधिक सहजपणे समजतात, म्हणून प्रस्तावित फ्रेमवर्कमध्ये ३८, ४०, ४२ या साईजऐवजी एस, एम आणि एल या अक्षरी (अल्फाबेटिकल) साईजना आधार बनवले जाईल. तथापि, प्रत्येक साईज श्रेणीत किती स्वीकार्य फरक असेल, यावर सध्या चर्चा सुरू आहे.

राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्थेने (एनआयएफटी) देशभरातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या २५ हजारांहून अधिक लोकांच्या शरीराचे माप घेऊन सविस्तर 'अँथ्रोपोमेट्रिक अभ्यास' (शरीररचना शास्त्रानुसार अभ्यास) केला आहे. याच आकडेवारीच्या आधारे खांदे, कंबर आणि इतर प्रमुख शारीरिक मापांचे मानक निश्चित केले जात आहेत, जेणेकरून भारतीय शरीराच्या रचनेनुसार उत्तम फिटिंगचे कपडे तयार करता येतील.

यामुळे ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागतो. एकसमान सायझिंग लागू झाल्यामुळे ग्राहकांना योग्य साईज निवडणे सोपे जाईल. तसेच ऑनलाइन खरेदीदरम्यान चुकीच्या साईजमुळे कपडे परत करणे आणि बदलून घेणे याचे प्रमाणही कमी होईल.

ऑनलाइन शॉपिंग होणार सोपी

सध्या भारतात बहुतांश कपडे तयार करणाऱ्या कंपन्या अमेरिका आणि ब्रिटनच्या 'साईज चार्ट'चा वापर करतात. मात्र भारतीय लोकांची शारीरिक रचना पाश्चात्य देशांतील लोकांपेक्षा खूप वेगळी असते. यामुळेच एकाच साईजची फिटिंग वेगवेगळ्या ब्रँडमध्ये वेगवेगळी असते. अनेकदा एखाद्या ब्रँडचा मिडियम साईज हा दुसऱ्या ब्रँडच्या स्मॉल किंवा लार्जच्या बरोबरीचा निघतो.

इथेनॉलमुक्त १०० ऑक्टेन पेट्रोलच्या वापरात दुपटीने वाढ

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : २० पेट्रोलबाबत सध्या सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर, इथेनॉल-मुक्त (इथेनॉल नसलेल्या) १०० ऑक्टेन प्रीमियम पेट्रोलच्या विक्रीत वाढ झाली आहे.

अहवालानुसार, गेल्या काही महिन्यांत याची विक्री दुपटीहून अधिक झाली आहे. जुलै महिन्यात या पेट्रोलची मागणी सर्वाधिक वाढली असून दिल्लीत याचा वापर सर्वात जास्त नोंदवला आहे. इंडियन ऑइलचे 'एक्सपी १००', भारत पेट्रोलियमचे 'स्पीड १००' आणि हिंदुस्तान पेट्रोलियमचे 'पॉवर १००' हे असे प्रीमियम पेट्रोल आहेत, ज्यांमध्ये एथेनॉल मिसळले जात नाही. हे पेट्रोल मुख्यत्वे सुपरकार्स, लक्झरी कार्स आणि हाय-परफॉर्मन्स बाइक्ससाठी तयार केले आहे. या पेट्रोलची किंमत सामान्य पेट्रोलपेक्षा सुमारे ५७% अधिक आहे. दिल्लीत याची किंमत प्रतिलिटर सुमारे १६० रुपये आहे. देशातील एकूण पेट्रोल विक्रीत या प्रीमियम पेट्रोलचा वाटा केवळ ०.१% इतका आहे.

उत्तर मध्य रेल्वे

ई-निविदा सूचना क्र. : जेएचएस- एन- डब्ल्यू- ५१- २६ दिनांक : २९.०७.२०२६

ई-निविदा सूचना

वरी. विभागीय संकेत आणि दूरसंचार अभियंता/ झाशी, डीआरएम यांचे कार्यालय, झाशी हे भारताच्या राष्ट्रपती करीता व त्यांच्या वतीने खालील कामांकरीता ऑन लाईन (ई-निविदा) माध्यमातून खुली निविदा मागवित आहेत.

ई-निविदा क्र. : जेएचएस- एन- डब्ल्यू- ५१- २६, कामाचे वर्णन : झाशी विभागाच्या सिग्नी. डीएसटी/ बीएल/ जेएचएस यांच्या अधिकार क्षेत्राच्या अंतर्गत जेएसएन - सीएनबी सेक्शन (१२.८ किमी.), जेएचएस - एमबीपी सेक्शन (५.८ किमी.) आणि एलएआर - केयूआरके सेक्शन (५.८ किमी.) मध्ये ट्रॅकच्या बाजूने असलेल्या आरसीसी सीमा भिंतीशी संबंधित सं. आणि दू. कामांची तरतूद करणे.

अंदाजित मूल्य :रु.१,३०,६७,०९१.७४/-	इसारा रक्कम : रु. २,६१,४००/-
निविदा प्रपत्राचे मुल्य : निरंक	निविदा उघडणे : दि. २५.०८.२०२६ रोजी वेळ १५.०० वा.
स्वीकृती पत्र जारी होण्याच्या वेळेपासून पुर्ण होण्याचा कालावधी : १२ महिने	

(१) निविदा दिनांक २५.०८.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करता येतील. (२) संपूर्ण तपशील आणि बोली सादर करण्याकरीता कृपया भारतीय रेल्वेच्या संकेतस्थळ www.ireps.gov.in वर पहा. (उत्तर मध्य रेल्वे/ झाशी विभाग - सं. आणि दूर.) 1738/26 (MG)

North central railways @CPRONCR www.ncr.indianrailways.gov.in

जाहीर नोटीस

माझे अशिल (सचिव/अध्यक्ष) डी.एन. नगर, श्री को-ऑप. हौ. सोसायटी लि., अंधेरी (पू.), मुंबई - ५०० ०६९ यांच्या सांगण्यावरून सदर जाहिरात देण्यात येते. डी.एन. नगर, श्री को-ऑप.हौ. सोसायटी लि., अंधेरी (पू.), मुंबई - ५०० ०६९ स्थित सोसायटी महाराष्ट्र हाऊसिंग आणि एरिया विकासक ऑथॉरिटीकडून हाऊसिंग बोर्डाच्या अखत्यारित असलेला प्लॉट मौजे डी.एन. नगर, तालुका अंधेरी, जि. मुंबई उपनगर क्षेत्र ११५७.४२ चौ. वार, ९६७.७१ चौ.मी. भूभाग दि. १७.१०.१९९५ च्या खरेदी खताद्वारे खरेदी केली व मूल्यांकन जिल्हा अधिकारी तालुका अंधेरीद्वारा मूल्यांकन करून स्टँप ड्युटी भरली.

सदर खरेदीखताची मूळ प्रत सोसायटीच्या/म्हाडाच्या कार्यालयातून गहाळ झाली आहे. कोणाही व्यक्तीस, संस्थेस सदर प्रत प्राप्त झाल्यास किंवा सभासदाने सदनिकेच्या गहाण खताबरोबर जोडली असल्यास सोसायटीच्या कार्यालयात आणून देणे किंवा ज्या व्यक्तीस मिळाल्यास खाली नमूद करण्यात आलेल्या पत्त्यावर पोच करणे.

१) डी.एन. नगर, श्री को-ऑप. हौ. सोसायटी लि., अंधेरी (पूर्व), मुंबई - ५०० ०६९.
२) महाराष्ट्र हाऊसिंग आणि एरिया विकासक, म्हाडा इमारत, वांद्रा (पू), मुंबई - ४०० ०५१.
३) १/१, गोविंद नगर, सीता निवासजवळ, व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ४०० ०७८.

सही/-
ॲड. व्ही.व्ही. एरम

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

सामग्री व्यवस्थापन विभाग

ई-निविदा सूचना क्र. : एनआयटी/ १४/ २६/ ३१, दिनांक : २८-जुलै-२०२६

अनु. क्र.	निविदा क्र.	संक्षिप्त वर्णन	निविदा बंद होण्याची/ उघडण्याची तारीख	खरेदी परि.
१	०६२६५०३९ ए	नॉन लायनर जंक्शन डिटेक्टर	१८.०८.२०२६	०३ नग
२	०७२६३०५४	आयईसी ६०९०३ :२०१४/ आयएस १३७७४ :२०२१ अनुसार ३६ केव्ही कार्यरत व्होल्टेज असलेले श्रेणी ४ हॅण्ड ग्लोव्ज	२१.०८.२०२६	१८८३ जोडी
३	०३२६३३९९	प्रायमरी ब्रेक बीम असे. एस्कॉर्ट्स डॉ. क्र. ईबी५५२१ सुधा.- १० किंवा नवीनतम	१४.०८.२०२६	५६७ नग
४	०४२६२४०८	४.५ किव्ही. अंडरस्लंग कॉन्स्टंट व्होल्टेज	१८.०८.२०२६	८० नग
५	०३२६२८९१	हेलिकल स्प्रिंग सेंटरलेस ग्राइंड	११.०८.२०२६	७८९ नग
६	०३२६२७९२	आरडीएसओ ड्रॉइंग अनुसार बॉक्साइन एक्सल करीता कपलर रॉड	२०.०८.२०२६	२९१६६ नग
७	०३२६२६८३ बी	ड्राफ्ट गिअर फॉलोअर समाविष्ट असलेला ड्राफ्ट गिअर	२०.०८.२०२६	६५२५ नग
८	०३२६२७७९ ए	''लॉक बोल्ट''	१२.०८.२०२६	१९८९४१ संच
९	०२२६४७३६	एलपी बनावटीच्या व्होल्व्हचा संच	२०.०८.२०२६	७८० जोडी
१०	०२२६४१५९	ड्रायव्हर डिस्प्ले युनिट (डीडीयू) टीआईन व्हीसीयू सुटेब	२४.०८.२०२६	१६ संच
११	०५२६५२९३ ए	कायमस्वरूपी वंगणयुक्त एचडीपीई डक्ट ४० मिमी. बाह्य व्यास	२६.०८.२०२६	१०१० किलोमीटर
१२	०५२६१२०१	आरडीएसओ विनिर्देशन क्र. एसटीएस/ ई/ रिलेज/ एसी एलआयटी एलईडी सिग्नल/ ०९- २००२ अनुसार एसी लॅम्प प्रोव्हिंग प्लग-इन टाईप, स्टाईल एसी एलईडी ऑल अस्पेक्ट रिले युनिट.	२७.०८.२०२६	२११२ नग
१३	०६२६५०३१ बी	गोलियाथ क्रेन - फ्टी चा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन	१४.०८.२०२६	१ नग

निविदा बंद होण्याची/ उघडण्याची वेळ : १०:३० वा.

निविदेचे कोणतेही शुध्दिपत्रक जारी करण्याचा अधिकार रेल्वे स्वतःकडे राखून ठेवीत आहे. विक्रेत्यांकरीता शुध्दिपत्रक किंवा महत्वाची सूचना लिंक www.ireps.gov.in मध्ये पाहू शकता. / विक्रेत्यांना शुध्दिपत्रक किंवा महत्वाची सूचना लिंक www.ireps.gov.in मध्ये पाहता येतील.

एएमएम/ ३, प्रमुख मुख्य सामग्री व्यवस्थापक यांच्याकरीता
द. पू. म. रेल्वे, बिलासपूर

CPR/10/315

South East Central Railway @secrail

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

UJJIVAN

नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालय: ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	तब्बाचा दिनांक	राखीव मूल्य आणि इरठे आणि इरठे आणि मध्ये
1	4505210130000217 & 4505210130000214 / 4505-VIRAR	१. शकील अहमद, २ सब्रून निशा अनु. क्र. १ येथे: केजीएन महाराष्ट्र अल्युमिनियम वर्क्स, एच क्र. डी ३, दुकान क्र ४ लक्ष्मी कंपाउंड, तळ मजला, मावपूर रोड, अलशिफा मेडिकल गल्ली, अवध नगर, बोईसर, पालघर, महाराष्ट्र ४०१५०१ दोघे येथे: क्र. ९३७९, आझाद नगर, गायत्री मेडिकल जवळ, सरावली, बोईसर, ठाणे, महाराष्ट्र ४०१५०१.	09.01.2024 / Rs.1879651.77 as on 08.01.2024	10.06.2026	Rs. 972000/- / Rs. 97200/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : पालघर येथील उप निबंधक क्षेत्रामधील गाव सालवाड, तालुका: पालघर, जिल्हा पालघर येथे असलेल्या आणि वसलेल्या रु. ४६५६.०६ पैसे कराधन असलेल्या ४०९.५ चौ. मी. क्षेत्रफळाच्या एनए जमिनीचा नवीन गट क्र. २३३, जुना सर्वे क्र. ६७/२ च्या भागावर बांधण्यात आलेल्या "पूनम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात इमारतीच्या बी विंगच्या पहिल्या मजल्यावरील ३८० चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळाच्या धारण केलेला सदनिका क्र. १०१. शकील अहमद आणि सब्रून निशा ह्यांच्या मालकीचे.				
2	4505210130000217 & 4505210130000214 / 4505-VIRAR	१. शकील अहमद, २ सब्रून निशा अनु. क्र. १ येथे: केजीएन महाराष्ट्र अल्युमिनियम वर्क्स, एच क्र. डी ३, दुकान क्र ४ लक्ष्मी कंपाउंड, तळ मजला, मावपूर रोड, अलशिफा मेडिकल गल्ली, अवध नगर, बोईसर, पालघर, महाराष्ट्र ४०१५०१ दोघे येथे: क्र. ९३७९, आझाद नगर, गायत्री मेडिकल जवळ, सरावली, बोईसर, ठाणे, महाराष्ट्र ४०१५०१.	09.01.2024 / Rs.1879651.77 as on 08.01.2024	10.06.2026	Rs. 1066000/- / Rs. 106600/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : पालघर येथील उप निबंधक क्षेत्रामधील गाव सालवाड, तालुका: पालघर, जिल्हा पालघर येथे असलेल्या आणि वसलेल्या रु. ४६५६.०६ पैसे कराधन असलेल्या ४०९.५ चौ. मी. क्षेत्रफळाच्या एनए जमिनीचा नवीन गट क्र. २३३, जुना सर्वे क्र. ६७/२ च्या भागावर बांधण्यात आलेल्या "पूनम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात इमारतीच्या बी विंगच्या पहिल्या मजल्यावरील ४०७ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळाच्या धारण केलेला सदनिका क्र. १०२. शकील अहमद आणि सब्रून निशा ह्यांच्या मालकीचे.				
3	441621013000 0243 / 4416-KALYAN	१.सुभाष मुखराम सिंह, २. राहुल सुभाष सिंह, ३. अलका सुभाष सिंह अनु क्र. १ येथे: दुकान क्र. ३, हार्ट बीट संकुल, पुजा अपार्टमेंट, इमा. क्र. १, इस्सार पेट्रोल पंप, हाजी मलंग रोड, कल्याण पूर्व, महाराष्ट्र ४२१३०६. अनु. क्र. २ येथे: श्री साई फर्निचर, दुकान क्र. १, नवजन, तळ मजला, नांदिवली कल्याण पूर्व, ४२१३०६. सर्व येथे: तळ मजला, ००१, ए विंग श्रद्धा रेसि., हाजी मलंग रोड, अदिवली, ढोकाळी, कल्याण पूर्व, ठाणे ४२१३०६	02.01.2024 / Rs. 539859.79 as on 01.01.2024	27.06.2026	Rs. 1102000/- / Rs. 110200/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत आदिवली ढोकाळी आणि उप नोंदणीकरण जिल्हा ठाणे च्या हद्दीमधील गाव- अदिवली ढोकाळी, तालुका- अंबरनाथ जिल्हा ठाणे येथे वसलेल्या ६९७ चौ. मीटर्स क्षेत्रफळ असलेल्या भार मुक्त विगर शेत जमिनीच्या मालमत्तेचा धारण केलेला सर्वे क्र.४५, हिस्सा क्र. १/५ ज्यावरील श्रद्धा रेसिडन्सी इमारतीच्या तळ मजल्यावरील ४८० चौ. फू. म्हणजेच (बिल्ट अप) ४४.६० चौ. मी. चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढीलप्रमाणे: पूर्व: गावदेवी कंस्ट्रक्शन, पश्चिम: श्रेया पार्क, उत्तर: भगवती होम्स, दक्षिण: राधे श्याम यादव ह्यांची मालमत्ता आणि श्रीमती अलका सुभाष सिंह, आणि श्री. सुभाष मुखराम सिंह ह्यांच्या मालकीची मालमत्ता.				
4	450521013000 0290 / 4505-VIRAR	१.मोहम्मद अस्लम मोहम्मद जहीर इद्रीशी, २. तय्यबा शेख अनु. क्र. १ येथे: स्मॉलन इंडिया फिल्ड एमएनजीटी प्रा. लि., दक्षवा बिल्डींग, ५ वा मजला, प्लॉट क्र. २, सेक्टर – II सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र ४००६१४. दोघे येथे: खोली क्र. ३०९, मुस्कान अपार्टमेंट, शंकर नगर, राजन पाडा, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, ठाणे, महाराष्ट्र ४०१२०९	29.05.2024 / Rs. 2138978.95 as on 28.05.2024	02.07.2026	Rs. 801000/- / Rs. 80100/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : उप निबंधक वसई ह्यांच्या क्षेत्रामधील गाव सोपारा, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे वसलेल्या १८३९.०१ चौ. मी. क्षेत्रफळ असलेल्या सर्वे क्र. ४४३, हिस्सा क्र. २ च्या जमिनीच्या भागावर बांधण्यात आलेल्या "साई सावली अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच